0 9 AUG 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अध्यासने ही लोकासने व्हावीत

## कुलगुरू डॉ. नितीन करमळकर : 'संत जनाबाई' ग्रंथ प्रकाशन सोहळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी,**

संतांवरील 'संत जनाबाई : साहित्य नभांगणातील चमकता तारा'सारखी पुस्तके लिहिली जातील. संत हे पुस्तकांच्या माध्यमातून लोकांमध्ये मिसळतील. तेव्हा अध्यासने ही लोकासने होतील, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले. नुकतेच येथील 'अक्षर दालन' प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केलेल्या डॉ. सुमंगला बाकरे लिखित ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजीव तुपसाखरे होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे श्री नामदेव अध्यासन व नामदेव समाजोन्नती परिषद शाखा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यामध्ये श्री संत शिरोमणी नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या ६७१ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त 'संत जनाबाई : साहित्य नभांगणातील चमकता तारा' या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. करमळकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, परिषदेचे मुख्य विश्वस्त तु. पा. मिरजकर, परिषदेचे पुणे विभागाचे उपाध्यक्ष संजय नेवासकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्राचे संचालक डॉ. समीर सहस्त्रबुद्धे, समस्त नामदेव शिंपी दैव मंडळाचे अध्यक्ष रमेश मेहेर, नामदेव समाजोन्नती परिषद पुणे शहर अध्यक्ष संदीप लचके, विजय कालेकर, रजनीकांत निखळ, अक्षय मांढरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 AUG 2021
पुढारी

# पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी आजपासून ऑनलाईन नोंदणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी सोमवारपासून (दि. ९) विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू होणार आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी तयारी केली आहे. बारावीच्या गुणांवर पदवी प्रथम वर्षासाठी प्रवेश दिला जाणार आहे.

मेरिट व प्रवर्गानुसार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रके मिळाल्यावर पुढील प्रक्रिया राबविली जाणार आहे. प्रवेशासाठी अर्ज भरून घेताना विद्यार्थ्यांकडून अँटी रॅगिंगचा अर्ज भरून घ्यावा, अशा सूचना शिवाजी विद्यापीठाने दिल्या आहेत. विवेकानंद महाविद्यालयातर्फे पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहे. यादी तयार करून २३ ऑगस्टला महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल, असे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी सांगितले.